
ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# कल्याणकारी राज्य आणि भारताचे संविधान: एक विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर
सहाय्यक प्राध्यापक , श्री. बाबासाहेब धाबेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, रिसोड
ता. रिसोड जि. वाशिम. (महाराष्ट्र)

## १) प्रस्तावना :-




जगामध्ये प्राचीन काळात पोलीस राज्य व्यवस्था अस्तित्वात होती. या पोलीस राज्य व्यवस्थेत राज्य संस्था ही कमीत-कमी लोकांच्या जसे राजा, राजघराण्यातील सभासद, मंत्री, त्यांचे नातेवाईक, धर्मगुरू, अधिकारी इत्यादींच्या जास्तीत जास्त कल्याणासाठी काम करीत होते. संपूर्ण राज्य संस्था ही मुठभर लोकांच्या हितासाठी कार्य करीत होत्या. त्यामुळे सामान्य जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविण्यात ही राज्य व्यवस्था निकामी होती. त्यांच्याकडे शासन व्यवस्थेचे खऱ्या अर्थान लक्ष नव्हते. सामान्य जनतेच्या जीवनासी संबंधीत प्रश्न शासनाने सोडविले पाहिजे असे शासन व्यवस्थेला कधीच वाटत नव्हते. फक्त जनतेकडुन कर गोळा करणे व अंगमेहनतीचे काम त्यांच्याकडून करुन त्यांचे शोषन करणे एवढेच काम पोलीस राज्य व्यवस्थेत शासन करीत असल्यामुळे बहुजन समाज हा दरिद्री, बेकार, घोर अज्ञानी अशा विदारक स्थितीत जीवन जगत होता. सामान्य लोकांचे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व स्वास्थ या सारखे मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी ह्या प्राचीन पोलीस राज्य व्यवस्था अपयशी ठरल्या होत्या, त्यामुळे सामान्य जनतेला अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगावे लागत होते. त्यामुळे पोलीस राज्य व्यवस्थे विरुध्द सामान्य जनतेच्या मनात असंतोष धगधगत होता. त्याचा परिणाम असा झाल की, जगातील अनेक देशातील लोकांनी पोलीस स्टेटच्या विरोधात आंदालने केलीत, सशस्त्र उठाव केला व ही व्यवस्था उलथुन टाकुन त्याएवजी कल्याणकारी राज्य व्यवस्थेची स्थापना केली.

आधुनिक काळात खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्याचा उदय झाला असला तरी प्राचीन काळात सुध्दा राज्यव्यवस्थेने काही नैतिक आदर्श व कल्याणकारी कार्य पार पाडावे अशी अपेक्षा केली जात होती. कौटील्याने राज्यांनी कोणती कार्य पार पाडावी हे सांगितले. तर ॲडीस्टॉटलने आदर्श राज्य कसे असावे हे सांगण्याचा प्रयत्न केला. मिल सारख्या विचारवंताने राज्यांची कर्तव्य सांगितली आहेत. बेंथम सारखे विचारवंत जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख हे राज्याचे कर्तव्य सांगतो. लास्की हा जगातील पहिला विचारवंत ज्यांनी जगाचे लक्ष पोलीस राज्याकडून कल्याणकारी राज्याकडे वेधले. भारताने सुध्दा कल्याणकारी राज्याचा दृष्टीकोन स्विकारला आहे आणि संविधानात राज्यनितीची मार्गदर्शकतत्वे हे स्वतंत्र प्रकरण जोडून लोककल्याण साधन्याचा प्रयत्न केला आहे.

## २) संशोधनाचा उद्देश :-

या संशोधन निबंधाचा उद्देश खालील प्रमाणे आहे .

१) कल्याणकारी राज्य या संकल्पनेचे अध्ययन करणे.

२) भारतीय संविधानात अंतर्भूत कल्याणकारी राज्याच्या तरतुदीचे अध्ययन करणे.

३) भारतीय शासन व्यवस्थेमध्ये राबविण्यात आलेल्या कल्याणकारी तत्वांचे अध्ययन करणे.

### ३) संशोधन पध्दती :-

या संशोधन प्रकल्पासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आलेला आहे. दुय्यम साधनामध्ये नियतकालीके, उपलब्ध साहित्य व शासनाचे विविध अहवाल यांचा वापर करण्यात आलेला आहे.

### ४) कल्याणकारी राज्याची संकल्पना :-

कल्याणकारी राज्याची संकल्पना स्पष्ट करण्याकरीता त्याच्या व्याख्येचे अध्ययन करणे गरजेचे आहे.

### ५) कल्याणकारी राज्याची परिभाषा :-

कल्याणकारी राज्याविषयी राजकीय विचारवंतांनी प्रतिपादीत केलेल्या व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

१)जी.डी.एच. कौल यांच्या मते, ''कल्याणकारी राज्य म्हणजे असे राज्य की, ज्यामध्ये प्रत्येक नागरीकाला निश्चित जीवनमानाची हमी प्राप्त होते व आपल्या गरजांची पुर्तता करुन घेण्याचा आणि त्यासाठी निश्चित व योग्य वेतनमान प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त होतो.''

२)ऑर्थर सेलींजर यांच्या मते, ''ज्या राज्यामध्ये नोकरी उदरनिर्वाहसाठी पुरेशे वेतन, शिक्षण, आरोग्य, निवासस्थान व सामाजिक सुरक्षितता इत्यादी सुखसोयी राज्यातील प्रत्येक नागरीकाला कोणताही भेदभाव न करता मिळतील अशी शासनाव्दारे हमी प्राप्त होते, त्या राज्याला कल्याणकारी राज्य असे म्हणतात.''

३)हर्बट लेहमन यांच्या मते, ''ज्या राज्यामध्ये व्यक्तीला स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होते व्यक्तीला आपल्या परिश्रमाचा योग्य पुरस्कार मिळतो व सुख प्राप्त करण्यासाठी सर्व प्रयत्न करण्याची संधी प्राप्त होते. ज्या ठिकाणी जाती, वंश, वर्ण इत्यादी आधारावर लोकांमध्ये भेदभाव होत नाही. लोकांना भूक, निवास आणि शोषण यांची भिती वाटत नसते त्या राज्याला लोककल्याणकारी राज्य असे म्हणतात.''

४)टी.डब्ल्यु. केन्ट यांच्या मते, ''आपल्या नागरीकांना व्यापक प्रमाणात सामाजिक सेवा उपलब्ध करुन देणारे राज्य म्हणजे कल्याणकारी राज्य होय. अशा कल्याणकारी राज्यामध्ये व्यक्तीच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी राज्याने स्विकारलेली असते. ''

५)अब्राहम लिंकन यांच्या मते, ''राज्यामध्ये राजकीय सत्तेचा विचारपूर्वक उपयोग नागरीकांच्या कामाचे व संपत्तीचे बाजारी मुल्य लक्षात न घेता त्यांच्या जीवनावश्यक गरजांची कमीत - कमी पुर्तता करण्यासाठी उत्पन्नाचे अधिकाधिक समान वाटप करण्याच्या उद्देशाने आर्थिक शक्तीच्या सर्व साधारण कार्यवाही बदल घडविण्यासाठी कार्य केले जाते ते कल्याणकारी राज्य होय.''

वरील व्याख्यावरुन कल्याणकारी राज्य ही व्यक्तींनी राज्याकडून नागरीकांच्या सुखी व समाधानी जीवनासाठी केलेली अपेक्षा आहे. कल्याणकारी राज्यासंबंधी अनेक विचारवंतांनी वेगवेगळे दृष्टीकोन मांडले आहेत. कल्याणकारी राज्यामध्ये व्यक्तीगत कल्याण समाविष्ट असले तरीही कल्याणकारी राज्याची हीच मुळ कल्पना आहे. व्यक्ती - व्यक्तीमध्ये संघर्षाऐवजी सहकार्य, न्याय, रोजगार, नियंत्रीत अर्थव्यवस्था, लोकशाही आणि नियोजनाचा मार्ग स्विकारुन व्यक्तींचा सर्वांगीण विकास करणे हाच लोकशाही राज्याचा उद्देश आहे. कल्याणकारी राज्याचे तत्वज्ञान स्पष्ट करणारा ग्रंथ 'Full Employment in free Society 1944' मध्ये प्रसिध्द झाला.

कल्याणकारी राज्याच्या संदर्भात पुढील तीन गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत.

१) लोककल्याण हा जनतेचा अधिकार आहे. हे राज्याने दिलेले दान किंवा नागरीकावर केलेली मेहरबानी नाही तर आपल्या नागरीकांचे जीवन सुखी व समाधानी बनविणे ही राज्याची जबाबदारी आहे.

२) यथार्थ कल्याणासाठी व्यक्ती व समाज यांचा घनिष्ट संबंध आहे ही भावना लोकांच्या मनात असली पाहिजे. ज्या गोष्टीचा संबंध एका व्यक्तीशी आहे तितकाच त्याचा घनिष्ट संबंध इतरांशीही आहे ही भावना प्रत्येक नागरीकांमध्ये असली पाहिजे.

३ )लोकांमध्ये भिक्षुकवृत्ती निर्माण होणार नाही याची जबाबदारी राज्याने घेतली पाहिजे. लोकांमध्ये परिश्रम करण्याची प्रेरणा व स्वावलंबनाची भावना नष्ट होणार नाही, अशा सावधगिरीने कल्याणकारी कार्यक्रम राबविले पाहिजे अन्यथा कल्याणकारी राज्य वरदान ठरल्यापेक्षा अभिशाप ठरण्याची शक्यता अधिक आहे.

### ६) कल्याणकारी राज्याचा अर्थ :-

कल्याणकारी राज्य हे आपल्या राज्यातील प्रत्येक नागरीकास किमान जीवनमान जगण्याची व प्रगतीची संधी उपलब्ध करुन देते. कल्याणकारी राज्यात प्रत्येक नागरीकांना रोजगार, शिक्षण, वैद्यकीय मदत, सामाजिक सुरक्षितता, उपजीविकेची साधने, राहण्याची व्यवस्था इत्यादी सर्व नागरीकांना उपलब्ध असतात आणि ते उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सरकारने स्विकारलेली असते.हे

कल्याणकारी राज्याचे अनिवार्य कार्य आहे. लोकांचे अंतर्गत व बाह्य आक्रमणापासून संरक्षण करण्याचे कार्य कल्याणकारी राज्यास करावे लागते. राज्य व्यवस्था समग्र जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ती व्यवस्था निर्माण करुन तीचे क्रियान्वयन करते.

**७) कल्याणकारी राज्याचा उदय व विकास :-**

कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला आधुनिक काळात महत्व प्राप्त झाले आहे. राज्य केवळ समृध्द आणि संपन्न लोकांची मक्तेदारी राहीली नाही तर मागासलेल्या व विकसनशील राष्ट्रांना सुध्दा कल्याणकारी राज्याच्या दिशेने प्रयत्न करावे लागत आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना ही फार प्राचीन आहे. सुसंस्कृत राज्यापासून ते अप्रगत राज्यापर्यंत समाजातील सर्वांना सुख हेच राज्याचे हित आहे या वाक्यानुसार राज्य करणारा राजा हा कल्याणकारी राज्यकर्ताच होता. प्राचीन भारतात कौटील्याचे अर्थशास्त्र यामध्येही कल्याणकारी राज्याचे स्वरुप दिसुन येते. अगदी प्राचीन कालखंड गुप्तकाळ, राजाहर्षवर्धन, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्य कारभार आणि १९५० नंतर आमलात आलेल्या संविधानातील विविध कलमाचा अभ्यास केल्यानंतर आपल्या देशात कल्याणकारी राज्याची किती चांगली परंपरा होती व आजही आहे हे लक्षात येते. राजाने आपल्या प्रजेप्रती पितृतुल्य व्यवहार करावा तसेच अनाथ, अपंग, गर्भवती स्त्री या सर्वांचे पालन-पोषण राजाने करावे असे कौटील्याच्या अर्थशास्त्रात म्हटले आहे.

आधुनिक काळात कल्याणकारी राज्य या संकल्पनेचा उदय सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाला. इंग्लंडमध्ये इ.स. १५७२ मध्ये प्रथम गरीब जनतेला सहाय्य देण्यासाठी एच्छिक देणग्या गोळा करण्याबद्दलचा कायदा करण्यात आला. इ.स. १६०१ मध्ये पहिल्या एलिजाबेद राणीच्या काळात गरीबांसाठी कायदा करुन त्यानुसार भिकाऱ्यांसाठी कारागृह आणि अपंगांना मदत करण्यात आली. सरकारने समाजातील गरजु लोकांची जबाबदारी स्विकारली. इ.स. १८९२ मध्ये निवडणुकीत ग्लॅडस्टन विजयी झाल्यानंतर त्याने कल्याणकारी उपायोजना सुरु केल्या १९ व्या शतकाच्या मध्यावर फ्रान्समध्ये तिसऱ्या नेपोलियनने कामगारांना मताधिकार, कामगार संघटनांना मान्यता, कामगारासाठी पगारवाढ, निवासस्थान आजारपणात मदत अशा कल्याणकारी तरतुदी केल्या होत्या. जर्मनीमध्ये प्रिन्स बिस्मार्कने वृध्दत्व, अपंगत्व, अपघात इत्यादी प्रसंगी कामागार कल्याण विषयक अनेक उपाय योजना केल्या. इ.स. १९०५ मध्ये ब्रिटनमध्ये गरिबीविषयक सर्वच कायद्यांची फेरतपासणी करण्यासाठी प्रसिध्द समाजवादी महिला विचारवंत ब्रिऍट्रिस च्या नेतृत्वात एक आयोग नेमण्यात आला. या आयोगाने दारिद्रय निवारणाचे सर्व जुने कायदे रद्द करावेत व त्या ऐवजी सामाजिक विम्याची सर्वकष योजना आमलात आणावी असे आपल्या अहवालात सुचविले. ब्रिटीश पंतप्रधान लॉईड जॉर्जनी इ.स. १९११ मध्ये राष्ट्रीय विमा कायदा आमलात आणला. रेल्वे कोळशाच्या खाणी, पोलाद उद्योग, दळव-वळण, बँका यांचे राष्ट्रीयकरण केले, हा कायदा तयार करण्यात ब्रिटीश अर्थतज्ञ विलियम ब्रिव्हरीज यांचा मोठा वाटा होता. दुसऱ्या महायुध्दात इ.स. १९४२ मध्ये त्याने ब्रीव्हवीज अहवाल तयार केला. आधुनिक काळातील कल्याणकारी राज्याचा जनक असे ब्रिव्हरीज यांना मानले जाते. ब्रिव्हरीज अहवालावर आधारीत राष्ट्रीय स्वास्थ व सुरक्षा कायदा ब्रिटनमध्ये १९४६ मध्ये करण्यात आला.

जर्मनीत प्रिन्स बिस्मार्कने इ.स. १८८० मध्ये सक्तीचा सामाजिक सुरक्षा कायदा केला. कामगार वर्ग बलशाली झाला तरच जर्मनी बलाढ्य होईल अशा विचाराने त्याने कायदा केला. त्यामुळे कामगार वर्गाची परिस्थिती खुपच सुधारली. अमेरीकेत १९२९ च्या महामंदी नंतर कल्याणकारी राज्याच्या दिशेने कायदे करण्यात आले. याचे श्रेय 'न्यु डिल' या नावाने प्रसिध्द असलेल्या नव्या आर्थिक धोरणाचा प्रवर्तक अध्यक्ष रुझवेल्ट याला जाते. सामाजिक असुरक्षिततेची कारणे दूर करण्यासाठी रुजवेल्टच्या कार्यकाळात व नंतरच्या काळात अनेक महत्वाचे कायदे करण्यात आले. फ्रान्समध्ये १९४६ च्या राज्यघटनेने सर्व नागरीकांना व विशेषत: बालकांना, मातांना, वृध्दांना आरोग्य व आर्थिक सुरक्षिततेची हमी दिली आहे. इटलीच्या १९४७ च्या राज्यघटनेनुसार समाजकल्याणकारी तत्वांची जबाबदारी सरकारवर टाकण्यात आली आहे. रशियामध्ये १९१७ च्या क्रांतीनंतर आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक विकास योजना आखण्यात आल्या. या योजनेव्दारे आरोग्य, गृहबांधणी, शैक्षणिक सुविधा इत्यादी योजनामध्ये शासनाची भागीदारी सुनिश्चित करण्यात आली.

कल्याणकारी राज्यव्यवस्था भारतासाठी नविन नाही. खऱ्या अर्थाने भारत हा कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा जनक देश आहे. कारण इ.स. पुर्व २६८ मध्ये सम्राट अशोकाचे राज्य खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्य होते. त्यांनी सर्वप्रथम पशु, पक्षांच्या हत्तेला प्रतिबंध घातला. प्राणी व मनुष्य यांच्या करीता चिकित्सालय सुरु केली. यामध्ये निःशुल्क उपचार केले जात होते. त्यांनी राजमार्गाच्या दोन्ही बाजुला फळझाडे तसेच छाया देणारे वृक्ष लावले, जेणेकरुन प्रवाशांना व पशुंना थंड वृक्षाच्या छायेखाली थांबता येईल. सम्राट अशोकराने रस्त्याच कडेला विहीरी खोदल्या, विश्रामगृह बांधले, जेणे करुन त्याचा लाभ प्रवाशांना घेता येईल. असे कितीतरी लोककल्याणकारी कामे सम्राट अशोकाने केल्यामुळे खऱ्या अर्थाने सम्राट अशोकाला कल्याणकारी राज्य व्यवस्थेचे जनक संबोधल्या जाते. परंतु मौर्य वंशाचा काळ सोडला तर भारतात नंतर येणाऱ्या शासकांनी पोलीस स्टेट नुसारच शासन कारभार केल्याचे दिसुन येते.

भारताच्या राज्यघटनेतही कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचे उद्दिष्ट मान्य करण्यात आले आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेत सामाजिक, आर्थिक व राजकिय न्याय प्रस्थापनेची ग्वाही देण्यात आली आहे. मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे ही एक प्रकारे भारताच्या

कल्याणकारी राज्याची संहिताच आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ मध्ये म्हटल्याप्रमाणे राष्ट्र हे लोकांना न्याय सामाजिक, आर्थिक, राजकिय संरक्षण आणि त्यांच्या कल्याणासाठी आवश्यक ते प्रयत्न करेल असे नमुद केले आहे.

## ८) कल्याणकारी राज्याची कार्य :-

कल्याणकारी राज्याचे प्रथम कर्तव्य म्हणजे लोकांना सुखी जीवनाची हमी देणे होय. यासाठी कल्याणकारी राज्याच्या कक्षेत व्यक्तिच्या जीवनाशी ज्या बाबी संबंधीत आहेत त्यांचा समावेश होतो. वर्तमान काळात कल्याणकारी राज्याबद्दल लोकांच्या अपेक्षा वाढु लागल्या आहेत. दारिद्रय, बेरोजगारीचे निवारण, उदरनिर्वाहाची साधने, कुटुंबकल्याण, वैद्यकीय मदत, शिक्षणाची व्यवस्था, शेतीचे यांत्रिकीकरण, रोजगाराची उपलब्धता इत्यादी कामे राज्यांनी करावी; अशी अपेक्षा आहे. परंतु आधुनिक काळात राज्याच्या कार्यकक्षेत वाढ झाली आहे. जनहिताच्या दृष्टीने राज्याला विविध कार्य करावी लागतात. राज्याने व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करु नये. केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचे कार्य करावे अशी नकारात्मक भुमिका राज्याबद्दल एकीकडे घेतली जात आहे. तर सकारात्मक दृष्टीने आधुनिक काळात राज्याच्या कार्याने विधायक भुमिकेचा स्विकार केला आहे.

## ९) भारतीय संविधानातील कल्याणकारी राज्य :-

भारताचे संविधान हे एक वैशिष्ट्यपुर्ण संविधान असुन यात संविधानाने आपल्या नागरीकांना सामाजिक, आर्थिक व राजकिय न्याय प्राप्त करुन देण्यासोबतच त्यांच्या संपूर्ण कल्याणाची ग्वाही दिली आहे. भारताच्या संविधानाची उद्देश पत्रिका कल्याणकारी राज्याची हमी देते. संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे विश्लेषण करता असे दिसून येते की, भारतीय नागरीकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्राप्त करुन देण्याचे आश्वासन राज्यव्यवस्था देते. तर प्रत्येक नागरीकास विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना याचे स्वातंत्र्यही देते. तसेच दर्जाची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करुन देण्याची ग्वाही देते. सर्वात महत्वाचे म्हणजे व्यक्तीची प्रतिष्ठा आबादीत राखण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. ही उद्देश पत्रिका म्हणजचे कल्याणकारी राज्य व्यवस्थेचा जाहीरनामा आहे.

भारतीय संविधान देशात कल्याणकारी राज्य व्यवस्था निर्माण करण्याचा उद्देश जाहीर केला आहे. हे संविधान केवळ मानवाच्या कल्याणाचा विचार करीत नसुन सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणाचाही विचार करते. हे संविधान शासनाला लोकांचे, पशु-पक्षांचे, वन्य जीवांचे रक्षण करण्याकरीता त्यांची काळजी घेण्याकरीता त्यांचे कल्याण करण्याचे मार्गदर्शन करते. जगात भारत हे एक लोककल्याणकारी राष्ट्र म्हणून विकसीत व्हावे असा घटनाकारांचा हेतू होता. भारतीय संविधानात कल्याणकारी राज्यव्यवस्थेच्या निर्मितीकरीता ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

१)संविधानाच्या कलम १४ हे कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही अशी हमी देते. या कलमानुसार सर्वांना सारखेच संरक्षण राज्यव्यवस्थेव्दारे उपलब्ध करुन दिले जाईल अशी हमी संविधानाने दिली आहे.
२)कलम १५ नुसार राज्य कोणत्याही नागरीकाला प्रतिकुल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या आधारावर भेदभाव करणार नाही.
३)कलम १६ नुसार राज्याच्या नियंत्रणाखाली कोणत्याही पदावरील नियुक्ती संबंधीमध्ये नागरीकास समान संधी असेल.
४)कलम १९ नुसार नागरीकास भाषा, अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य, शांततेने विनाशस्त्र, एकत्र जमण्याचा व संघ स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. भारताच्या कोणत्याही भागात स्थायी होण्याचा व्यवसाय किंवा धंदा चालविण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.
५)कलम २१ नुसार कायद्याव्दारे प्रस्थापीत केलेली कार्यपध्दती अनुसरल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस जीवित किंवा व्यक्तीगत स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही याची हमी देण्यात आली आहे. म्हणजेच हे कलम लोकांच्या जीवित व व्यक्तीगत स्वातंत्र्याची हमी देते. कलम २१ (क) नुसार राज्य ६ ते १४ वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतुद करेल असे असुन याव्दारे राज्यातील सर्व बालकांच्या शिक्षणाची काळजी राज्यव्यवस्थेने घ्यावी असे सांगितले आहे.
६)कलम २३ नुसार भारतीय संविधान हे शोषणाच्या सर्वस्वी विरोधात आहे असे दिसुन येते. यात माणसाचा व्यापार वेठबिगारी व त्या सारख्या अन्य स्वरुपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे.
७)कलम २४ नुसार १४ वर्ष वयाच्या खालील मुलास कारखाण्यात किंवा खानीत काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. याव्दारे बालकामगारांना संरक्षण प्रदान करुन त्यांचे शोषण थांबविण्यात आले आहे.

**१०) राज्यधोरणाची निदेशक तत्वे :-**

हा संविधानातील अत्यंत महत्वपूर्ण भाग आहे. राज्यव्यवस्थेने देशाच्या आणि सामान्य जनतेच्या हिताकरीता प्रामुख्याने सामाजिक व आर्थिक विकासाकरीता क्रियान्वीत करावयाचा कार्यक्रम यात निर्देशीत करण्यात आलेला आहे, ही मार्गदर्शक तत्वे संविधानातील भाग - ४ मध्ये अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. या तत्वानुसार राज्यांनी कायदेकरून सामान्य जनतेला आर्थिक व सामाजिक न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा घटनाकारांनी व्यक्त केली आहे. अनुच्छेद ३८ (१) नुसार राज्य हे सामाजिक, आर्थिक व राजकिय न्यायाव्दारे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व घटकामध्ये प्रेरणा निर्माण करील अशी समाजव्यवस्था प्रस्थापीत करून तिचे जतन करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी प्रत्यत्नशील राहील असे नमुद करण्यात आले आहे. अनुच्छेद ३८(२) नुसार राज्य हे केवळ व्यक्ती-व्यक्तीमध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या किंवा व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकसमुहामध्ये देखिल उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता कमी करण्याचा प्रयत्न करील आणि दर्जा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील. कलम ३८ हे सामाजिक, आर्थिक व राजकिय न्यायावर आधारीत समाजव्यवस्था प्रस्थापनेसाठी राज्यांनी काय करावे या संबंधी राज्यांना मार्गदर्शन करते.

अनुच्छेद ३९ (क) नुसार उपजीविकेचे पुरेशे साधन मिळविण्याचा हक्क सर्व नागरीकांना सारखाच असावा. अनुच्छेद ३९ (ख) अन्वये सामुहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रितीने समाजाच्या भौतिक साधन संपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी.

अनुच्छेद ३९ (ग ) नुसार आर्थिक यंत्रणा राबविण्याचा परिणाम म्हणून संपत्तीचे व उत्पादन साधनांचा संबंध सामुहिक हितास बाधक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी होऊ नये.

अनुच्छेद ३९ (घ) नुसार पुरूष व स्त्रिया यांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.

अनुच्छेद ३९ (ड) नुसार स्त्री व पुरुष कामागाराचे आरोग्य व शक्ती यांचा दुरूपयोग करण्यात येऊ नये. तसेच त्यांना असुरक्षित व्यवसाय करण्यास भाग पाडु नये.

अनुच्छेद ३९ (च) नुसार बालकांना स्वतःचा विकास करण्याची संधी व सुविधा देण्यात याव्यात. युवकांना शोषणापासून व भौतिक दर्जाच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे.

अनुच्छेद ३९ (क) नुसार राज्य हे न्यायाची समान संधी निश्चित करील व मोफत कायदेविषयक सहाय्य उपलब्ध करून देईल.

अनुच्छेद ३९ हे खऱ्या अर्थाने जनतेच्या समाजिक व आर्थिक विकासाकरीता राज्यव्यवस्थेने राबवावयाचा कृती कार्यक्रम आहे. यामुळे लोकांचे कल्याण साधने हे राज्यव्यवस्थेचे कार्य आहे हे वरील तरतुदीवरून स्पष्ट होते.

अनुच्छेद ४१ नुसार राज्य हे आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पिढीत अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसतांना हलाखीचे जीवन ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा अन्य व्यक्तीचे बाबतीत लोकसहाय्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतुदी करील. हे कलम खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्याची स्थापना करण्याच्या दृष्टीने शासनास शासनास कोणते कार्य करावयाचे ते सांगते.

अनुच्छेद ४२ अन्वये राज्य हे कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसुतीविषयक सहाय्यासाठी तरतुद करेल.

अनुच्छेद ४३ अन्वये राज्य हे शेतकी, औद्योगीक व अन्य प्रकारच्या सर्व कामागारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पुर्ण उपयोग याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील. विशेषतः ग्रामीण क्षेत्रामध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्वावर कुटिरोद्योगाचे संवर्धन करण्यासाठी राज्य हे प्रयत्नशील राहील.

अनुच्छेद (क) नुसार राज्य हे कोणत्याही उद्योगधंद्यात, उपक्रम आस्थापना किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी विधी-विधानाव्दारे किंवा अन्य मार्गाने उपाय योजना करील.

अनुच्छेद ४४ नुसार नागरीकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरी संहीता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

अनुच्छेद ४५ अन्वये राज्य सर्व बालकांसाठी त्यांच्या वयाची ६ वर्षे पुर्ण होईपर्यंत त्यांची देखभाल आणि शिक्षण याकरीता प्रयत्न करेल. लहानमुले ही देशाची संपत्ती समजण्यात येते. अशा लहान बालकांचे संगोपन योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने राज्यव्यवस्थेने काळजी घ्यावी असे हे कलम सांगते.

अनुच्छेद ४६ नुसार देशातील हजारो वर्षापासून सामाजिक, आर्थिक शोषण होत असलेल्या मागासवर्गीय व दुर्बल घटकांचे विशेषतः अनुसूचति जाती व जमातीची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी त्यांचे सबलीकरण करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे असे दिशा निर्देश देते. या कलमा नुसार राज्य हे दुर्बल घटकाच्या विशेषतः अनुसूचित जाती व जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजी पुर्वक करून त्यांना सामाजिक न्याय व सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण देईल असे निर्देश देते.

अनुच्छेद ४७ नुसार आपल्या जनतेचे राहणीमान व पोषण उंचावने आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे राज्याचे प्राथमिक कर्तव्य मानण्यात आले आहे. आरोग्यास अपायकारक अमली पदार्थाचे सेवनावर प्रतिबंध घालण्यासाठी प्रयत्नशील राहील अशी तरतुद करण्यात आली आहे.

अनुच्छेद ४८ नुसार आधुनिक व शास्त्रीय पध्दतीने कृषी व पशुसंवधन याची सुव्यवस्था लावण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. विशेषत: गायी, जनावरे यांच्या जातीचे जतन करुन त्यात सुधारणा करणे व त्यांच्या कत्तलीला मनाई करण्याकरीता राज्य उपाय योजना करेल.

अनुच्छेद ४८ (क) नुसार देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वन्यजीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील अशी तरतुद करण्यात आली आहे.

अनुच्छेद ४९ नुसार राष्ट्रीय महत्वाची स्मारके, स्थान, वस्तु यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्याची राहील.

अनुच्छेद ५० नुसार राज्याच्या लोकसेवामध्ये न्याययंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवण्याकरीता राज्य उपाय योजना करेल.

अनुच्छेद ५१ नुसार आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रामध्ये न्यायसंगत व सन्मान पूर्वक संबंध राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय तंटे लवादा मार्फत मिटविण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील, असे सांगुन जागतिक स्तरावर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील असे सांगितले आहे.

अनुच्छेद ५१ (क) नुसार भारतीय नागरीकाची मुलभूत कर्तव्य सांगितली आहेत, यामध्ये धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीयांमध्ये सामांजस्य व बंधुभाव वाढीस लावणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे भारतीय नागरीकांचे कर्तव्य आहे. विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन स्विकारणे, मानवतावादाचा स्विकार करणे, हिंसाचाराचा त्याग करणे, वने, नद्या व वन्यजीवसृष्टी यांचे रक्षण करणे व प्राणीमात्राबद्दल दयाबुध्दी बाळगणे हे नागरीकांचे परम कर्तव्य आहे हे कर्तव्य १९७६ मध्ये ४२ व्या संविधान दुरुस्तीव्दारे संविधानात अंतर्भूत करण्यात आले आहे.

वरील सर्व कलमांचा अभ्यास केल्या नंतर असे दिसुन येते की, संविधानकर्त्यांना या देशात कल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण करावयाची होती, त्याव्दारे समग्र मानवाचे पशु-पक्षांचे व जीवसृष्टीचे कल्याण करावयाचे होते. जगात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापीत करावयाची होती. भारताचे संविधान हे एक कल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण करणारे संविधान आहे हे यावरुन दिसुन येते.

## निष्कर्ष :-

भारतीय संविधानाने लोकांच्या कल्याणसाठी राज्यव्यवस्थेने आवश्यकतेनुसार कोणती धोरणे निर्माण करावी याचे मार्गदर्शन मार्गदर्शक तत्वामध्ये केले आहे. भारतात समता, स्वातंत्र्य व बंधूतेवर आधारीत शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट संविधानाच्या प्रस्तावना व मुलभूत तत्वामधुन व्यक्त केले आहे. यासाठी मार्गदर्शक तत्वाची रचना करुन शासनाने त्याकरीता कायदे करण्याचे मार्गदर्शनक केले आहे. भारतीय शासनव्यवस्थेने कल्याणकारी राज्याचे धोरण स्विकारले असले तरीही जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे राज्याच्या नितीनिर्धारणाच्या धोरणात बदल होतांना दिसुन येतो. भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिका, मुलभूत अधिकार यात नागरीकांचे हित संवर्धन करुन त्यांना सुयोग्य व चांगले, उच्च दर्जाचे जीवनमान जगण्याचे व शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण करण्याची हमी देण्यात आली असली तरीही त्या दृष्टीने व्यापक प्रमाणात राज्य व्यवस्था कार्य करतांना दिसुन येत नाही. भारतीय संविधानातील राज्यनितीनिर्देशक तत्वात चांगले जीवनमान जगण्यासाठी व आरोग्य संवर्धनासाठी राज्यव्यवस्था कायदे करेल असे असले तरीही आज मोठ्या प्रमाणात या राज्यनितीनिर्देशक तत्वाच्या विरोधी वर्तन, व्यवहार व कायदे राज्यव्यवस्था करतांना दिसुन येते.

कामाचे मर्यादीत तास, कामाची हमी, कायदेशीर संरक्षण, सुरक्षेचे उपाय, आरोग्यदायी सेवा स्थिती, व्यवस्थापनात प्रतिनिधीत्व या सर्व गोष्टींना कामगार वर्ग आज पारखा झाला आले. शैक्षणिक विषमता कमी करणे, १४ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी शिक्षणशक्तीचे व मोफत करणे, सर्वांना सारखे शिक्षण मिळण्याची व्यवस्था करणे, शिक्षणातून सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान करणे, अद्यावत ज्ञान मिळविता येणे याकरीता राज्यव्यवस्थेव्दारे कार्य होतांना दिसत नाही. कल्याणकारी योजनावरील खर्च शासनाने कमी केल्यामुळे आरोग्य, अन्नधान्याची कमतरता झाली आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. स्त्रियांच्या आयुष्यमानात कुपोषण, गरिबी, कमालीची असुरक्षितता व विविध प्रकारचे शोषण यांचे काळे रंग आहे.

आज मोठ्या प्रमाणात खाजगी रुग्णालय, शिक्षण संस्था, औद्योगीक वसाहती निर्माण होतांना दिसुन येतात. खऱ्या अर्थाने ही व्यवस्था शासनाने निर्माण करुन नागरीकांना चांगले जीवनमान उपलब्ध करुन देणे अगत्याचे आहे. परंतू शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावातून कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेकडे राज्य दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. आर्थिक केंद्रीकरणास सुरुवात झाली असुन बहुसंख्य लोकांचे हाल व मुठभर लोकांचे हित यातून जोपासल्या जात आहे. कुटिरउद्योग, लघु उद्योग यांचा ऱ्हास होऊन बेरोजगारांची समस्या निर्माण झाली आहे. शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होऊन विविध गटात संघर्ष निर्माण झाले आहे. यामुळे सर्व सामान्याचे जीवन व समाज हीत अवरुध्द झाले आहे

भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ ते ३५ मध्ये अंतर्भूत मुलभूत हक्काच्या प्रस्तापनेसाठी राज्य व्यवस्थेने व्यापक प्रमाणावर कार्य करणे गरजेचे आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये अंतर्भूत तत्वानुसार राज्यव्यवस्थेने धोरण निर्माण करून लोकांना उपजीविकेचे साधन, उद्योग, व्यापार करण्याची संधी, चांगले आरोग्य, उच्च दर्जाचे जीवन, शोषणमुक्त सामाजिक व आर्थिक जीवन जगण्यासाठी परिस्थिती निर्माण करणे गरजेचे आहे. कामाच्या ठिकाणी बालकांचे व महिलांचे शोषण थांबविण्यासाठी राज्यव्यवस्थेने प्रयत्न करणे अगत्याचे आहे. आज काही प्रमाणात राज्यव्यवस्था या तत्वांपासून फारकत घेऊन या तत्वांच्या विरोधी वर्तन करतांना दिसून येते असे केल्यास संविधानात अंतर्भूत कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्ष व्यवहारात येणार नाही, त्यामुळे या तत्वांच्या प्रस्थापनेसाठी राज्यव्यवस्थेने प्रयत्न करणे गरजेचे आहे. या तत्वांना पुरक व्यवस्था निर्माण करून यात उल्लेखल्यानुसार कायदे करुन कल्याणकारी राज्याचे स्वरुप साकारता येते. असे केल्याने घटनाकारांना अभिप्रेत असलेले राज्य निर्माण होईल यात शंका नाही.

### संदर्भ ग्रंथ -


१) पिपलायन मधुकर, सम्राट अशोक, सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली, पृ. ५५.
२) खैरमोडे चा. भ., डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, खंड ६, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. ३६.
३) भारताचे संविधान, संचालक, मुद्रन व लेखण सामुग्री महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रीत, पृ. १६.
४) उपरोक्त, पृ. १८.
५) कराडे जगन, जागतिकीकरणात भारता समोरील आव्हाने, डायमन प्रकाशन, पुणे पृ. ७२.
६) हडप जी. एन., कामगार दशा आणि दिशा, रविराज प्रकाशन, नागपूर, पृ. ४४.
७) भारत सरकार, आर्थिक सर्व्हेक्षन, सन २०१०-११.
८) कुबेर गिरीश, महागाईचे जागतिकीकरण, लोकसत्ता, ३ ऑगष्ट २०१२.
९) फाडीया बी. एल., राजनिती चिंतन, साहित्य भवन प्रकाशन आग्रा, २००९.





**प्रा. डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर**
**सहाय्यक प्राध्यापक , श्री. बाबासाहेब धाबेकर कला व वाणिज्य महाविद्याल, रिसोड**
**ता. रिसोड जि. वाशिम. (महाराष्ट्र)**